महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०१७

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

वसई तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी मौजे जुचंद्र येथील स.नं.९१, १२४, १२५, १२९ ही शासकीय जमीन मिळणेबाबत

(१) ३९३८ (२२-१२-२०१४). श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती, वसई यांनी मौजे जुचंद्र येथील स.नं.९१, १२४, १२५, १२९ ही मार्केट यार्ड साठी राखीव असणारी शासकीय जमीन मिळण्याची मागणी दिनांक २१ सप्टेंबर, २०११ रोजीच्या निवेदनाद्वारे मा.महसुलमंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय आयुक्त, कोकण विभाग ह्यांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०११ रोजीच्या पत्रान्वये प्रधान सचिव, महसूल विभागयांचेकडे योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता करून त्याबाबतचा प्रस्ताव मंजूरीसाठी पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) तसेच उक्त प्रस्ताव पाठवुन सुध्दा अद्यापपर्यंत सदर जमीन कृषी उत्पन्न बाजार समितीला न देण्याची कारणे व यामागील शासनाची भुमिका काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-११-२०१७) : (१), (२), (३) व (४) सभापती वसई कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी दि. १९/११/२०१० रोजीच्या निवेदनान्वये कृषी उत्पन्न बाजार समितीस जमीन मिळणेबाबत मागणी केली असून त्याअनुषंगाने विभागीय आयुक्त कोकण यांनी दि.२१/०९/२०११ रोजीच्या पत्रान्वये प्रश्नाधिन जमीन वसई तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीस देणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला होता. परंतू दि.२१/०६/२०१२ रोजी मंत्रालयास लागलेल्या आगीमध्ये सदर प्रकरणाची नस्ती जळून नष्ट झाल्याने विभागीय आयुक्त कोकण यांनी पुर्नबांधणी करून प्रस्ताव सादर केलेला होता. प्रकरणी अर्जदार संस्थेने मागणी केलेली जमीन सीआरझेड क्षेत्रात येत असल्याने प्रकरणी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी (MCZMA) ची मान्यता असणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने अर्जदार संस्थेने जिल्हाधिकारी

यांचेकडे MCZMA च्या मान्यतेसाठी अर्ज करणे आवश्यक असल्याने त्याबाबतच्या सूचना जिल्हाधिकारी, पालघर यांना शासन दिनांक २९.१०.२०१५ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

राज्यातील नागरी भागात तुकडेबंदी अथवा तुकडेजोड कायद्यात सुधारणा केल्याबाबत

(२) ४२८०७ (२०-०४-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागरी भागात तुकडेबंदी अथवा तुकडेजोड कायद्यात काही नियमांच्या अधीन राहून सुधारणा करण्याचा निर्णय दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरी नियोजनासाठी सर्व भागांमध्ये निवासी, वाणिज्य, औदयागिक व्यवसायांना सहजपणे जमीन उपलब्ध व्हावी यासाठी महाराष्ट्र धारण जमीनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबतच्या अधिनियमातील तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गुंठेवारी क्षेत्रामध्ये नागरीकांनी केलेल्या अनधिकृत बांधकामांना अधिकृत करण्याबाबत शासनाने कुठलाही निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील नागरीभागासह ग्रामीण भागातही तुकडेबंदी अथवा तुकडेजोड कायदा शिथीलकरण्याबाबत व या अनधिकृत बांधकामांना दंड आकारुन अधिकृत करण्याबाबत शासन स्तरावरुन कुठली कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-११-२०१७) :(१) व (२) महाराष्ट्र शासन राजपत्र दि. १ जानेवारी, २०१६ मध्ये प्रसिध्द "महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम २०१५" अन्वये मूळ अधिनियमाचे कलम ८अ नंतर जादा कलम ८ब समाविष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार महानगरपालिका / नगर परिषद / विशेष नियोजन प्राधिकरणांच्या सीमांमध्ये / अधिकारितांमध्ये स्थित जमिनी तसेच, प्रारुप किंवा अंतिम प्रादेशिक योजने मध्ये निवासी / वाणिज्यिक / औद्योगिक किंवा अन्य कोणत्याही अकृषिक स्वरुपाच्या वापरासाठी नेमून दिलेल्या शेत जमिनींच्या संदर्भात तुकडेबंदी विषयक पूर्वीचे निर्बंध कमी करण्यात आले आहेत.

(३), (४) व (५) या संदर्भात महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमानुकुल करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ अन्वये दि.०१.०१.२००१ पर्यंतची पात्र गुंठेवारी नियमानुकुल करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०१७ अन्वये प्रचलित प्रारुप किंवा अंतिम प्रादेशिक योजनेत निवासी / औद्योगिक / वाणिज्यिक / सार्वजनिक अथवा निमसार्वजनिक अथवा अन्य कोणत्याही अकृषिक प्रयोजनासाठी दर्शविण्यात आलेल्या वापर

विभागात कृषि जमिनींच्या बाबतीत तुकडेबंदी विषयक मूळ अधिनियमातील तरतूदींविरुध्द झालेले हस्तांतरण अथवा विभाजनाचे व्यवहार विशिष्ट नियमाधीनकरण अधिमूल्य आकारुन नियमित करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

तुमसर आणि मोहाडी (जि.भंडारा) येथील तहसील कार्यालयासाठी प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत

(३) ४७५७५ (२०-०४-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.संजय पुराम (आमगाव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर आणि मोहाडी (जि.भंडारा) येथील तहसील कार्यालयासाठी प्रशासकीय इमारत मंजूर करण्याबाबतच्या जिल्हा स्तरावरुन सन २०१२ पासून पाठविण्यात आलेल्या प्रस्तावास मंजुरी देण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधी (तुमसर) यांनी दिनांक २५ डिसेंबर, २०१३ व दिनांक २८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त ठिकाणच्या इमारतीच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१७-११-२०१७) :(१), (२) व (३) होय.

सदर प्रस्तावास दि.६/६/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार सचिव समितीची मान्यता प्राप्त झाली आहे. प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही निधी व निकष यानुसार प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

मौजे हिरेवाडी (ता.कर्जत, जि.रायगड) येथील आदिवासींचा रस्ता मोकळा करण्याबाबत

(४) ५४०२९ (१९-०८-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हिरेवाडी (ता.कर्जत, जि.रायगड) येथे श्री.समीर राणा या व्यावसायिकाने जमीन खरेदी केल्यानंतर जवळपास ३०० आदिवासी वस्तीसाठी असलेला व सद्य:स्थितीत बंद केलेला रस्ता खुला करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे निवेदनद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता बंद केल्यामुळे आदिवासींना खडतर प्रवास करावा लागत असल्याने तत्कालीन तहसीलदार यांनी सन २००२ मध्ये उक्त रस्ता खुला केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त व्यावसायिकाने पुन्हा रस्ता बंद केल्यामुळे आदिवासींची फार मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आदिवासी बांधव वंश परंपरागत वापर करित असलेला उक्त रस्ता मोकळा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-११-२०१७) :(१) या स्वरुपाची मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून तहसिलदार, कर्जत यांच्याकडे करण्यात आली आहे.
(२), (३), (४) व (५) मौजे जामरुंग ता कर्जत येथील स.नं.१९२/३ क्षेत्र ३-६६.६ हे.आर श्री.समीर अेन राणा व श्री. एस शंकर यांचे नावे दाखल आहे. तथापि श्री.समीर अेन राणा यांनी हिरेवाडी गावाच्या दक्षिण दिशेला जाणारा मार्ग बंद केल्याबाबतची तक्रार ग्रामस्थ हिऱ्याचीवाडी जामरुंग यांनी तहसिलदार, कर्जत यांचेकडे दाखल केली होती. प्रस्तुत प्रकरणी मामलेदार कोर्ट ॲक्ट नुसार तहसिलदार, कर्जत यांचे कार्यालयात सुरु असलेल्या दाव्यामध्ये दिनांक २३.१०.२०१७ रोजी अंतिम आदेश पारीत झाले असून ग्रामस्थांसाठीचा रस्ता पूर्ववत मोकळा करुन देण्याबाबत प्रतिवादी यांना आदेशीत करण्यात आले आहे.

मौजे कळंभे (ता.शहापुर, जि.ठाणे) येथे सामाजिक व लोककल्याणाची कामे करण्याबाबत

(५) ५७२५७ (१९-०८-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कळंभे (ता.शहापुर, जि.ठाणे) येथे सामाजिक व लोककल्याणाची कामे करण्यासाठी व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक बांधण्यासाठी मौजे कळंभे येथील गट नंबर २५ क्षेत्र ०.१०.०० ची मागणी मा.महसूल मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०८-११-२०१७) :(१) अशा आशयाचे स्थानिक लोकप्रतिनिधींचे दि.२८/०३/२०१६ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. मात्र, मौजे कळंभे, ता.शहापूर, जि.ठाणे ग.नं. २५ क्षेत्र ०-१०.० हे-आर या क्षेत्रास असलेली गृहखात्याची हरकत रद्द करुन मिळणेबाबत डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज प्रबोधन मंडळ यांनी विनंती केली आहे.
(२), (३) व (४) मौजे कळंभे, ता.शहापूर, जि.ठाणे ग.नं. २५ क्षेत्र ०-१०.० हे-आर ही जागा न्यायालयाच्या बांधकामासाठी न्यायालयाच्या नावे वर्ग करण्याची प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांनी मागणी केली आहे. सदर जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असून सदर जागा विधी व न्याय विभागास जिल्हा न्यायालय, ठाणे यांना वर्ग

करण्याकरीता जिल्हाधिकारी, ठाणे यांना प्रत्यार्पित करण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाने दि.११/०४/२०१७ च्या ज्ञापनान्वये ना हरकत कळविली आहे.

अलिबाग (जि.रायगड) येथे किनारपट्टी लगत बेकायदेशीररित्या केलेल्या भरावांमुळे कांदळवने नष्ट होत असल्याबाबत

(६) ५८४३१ (२३-०९-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील किनारपट्टीलगत घरे बांधण्यासाठी बेकायदेशीररित्या करण्यात आलेल्या भरावांमुळे कांदळवने नष्ट होवून संपूर्ण अलिबाग तालुका पाण्याखाली जावून मोठया प्रमाणात जिवीत व वित्त हानी होण्याची स्थिती निर्माण झाली असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक ग्रामस्थांनी बेकायदेशीर घातलेला भराव तात्काळ थांबवण्याच्या तक्रारी वारंवार करूनही भराव करण्याचे काम अद्यापही सुरू आहे, तसेच संबंधित विभाग याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (३१-१०-२०१७) :(१), (२) व (३) अलिबाग तालुक्यातील किनारपट्टीलगत घरे बांधण्यासाठी बेकायदेशीररित्या करण्यात आलेल्या भरावामुळे कांदळवने नष्ट होवून संपूर्ण अलिबाग तालुका पाण्याखाली जावून मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्त हानी होईल अशी कोणतीही परिस्थिती निर्माण झाल्याचे निदर्शनास आले नाही. तथापि, अलिबाग तालुक्यातील मौजे बेलकडे, शहापूर, शहाबाज व अलिबाग येथे काही ठिकाणी अनधिकृत भराव केल्याची बाब निदर्शनास आली असून मंडळ अधिकारी, अलिबाग यांचेमार्फत पोलीस ठाणे, अलिबाग येथे भराव करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

डहाणू (जि.पालघर) येथील मुंबई-अहमदाबाद महामार्गावर सातिवली, टाकवहाल, जव्हार फाटा, नांदगाव, हालोली या भागात अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

(७) ५८८५७ (२९-०८-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) येथील मुंबई -अहमदाबाद महामार्गावर सातिवली,टाकवहाल ,जव्हार फाटा, नांदगाव, हालोली या भागात अनधिकृतपणे धाबे, व्यापारी गाळे, हॉटेल्स यांची बांधकामे सुरु असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,तलाठी कार्यालयासमोरच ही बांधकामे सुरु असून, महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमतामुळे सदर कामे चालू आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने सदर अनधिकृत बांधकामावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-११-२०१७) : (१) होय
(२) असे निदर्शनास आले नाही.
(३) व (४) पालघर तालुक्यातील मुंबई-अहमदाबाद मार्गावरील नांदगाव तर्फे मनोर, आवंढाणी येथील बेकायदा बांधकामे निष्कासित करण्यात आलेली आहेत. तसेच सातिवली व हालोली येथील अनधिकृत बांधकामाविरुध्द दंडनिय कारवाई करण्यात आलेली आहे.

म्हाडाच्या सदनिका भूखंडाच्या सात-बारावर नोंद करताना येणाऱ्या अडचणीबाबत

(८) ५९७३९ (१९-०८-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडाच्या सदनिका भूखंडाच्या सात-बारावर नोंद करताना मूळ मालकाचे नाव नसल्याने खरेदी-विक्रीचे दस्त रखडल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपनिबंधक (नोंदणी) कार्यालयाने सदर जाचक अट घातल्याने अनेक अडचणी निर्माण झाल्या असून सदरहू जाचक अट काढून टाकण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक होऊनही अदयाप निर्णय झाला नसल्याने व्यवहार ठप्प झाले आहेत, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर अट काढुन टाकण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-११-२०१७) :(१) व (२) असे निदर्शनास आले नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

स्पेशल स्टिल कंपनीस शासनाने औद्योगिकीकरणासाठी दिलेली जमीन कंपनी मालकाने विकासकास विकल्याबाबत

(९) ६०८४१ (२२-०८-२०१६). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.सदा सरवणकर (माहिम) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्पेशल स्टिल लि.कंपनी, मागाठाणे व्हिलेज, बोरीवली (मुंबई) या कंपनीला राष्ट्रवादी-काँगेस आघाडी शासनाने भूसंपदान कायदा १८८८ अन्वये सर्वे नं.२३/३, २४/३, ३२/१ प्लॉट, ३२/२, ३२/३ व ३३ असे प्लॉट असलेली २२ एकर जमीन औद्योगिकरणासाठी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीनीचा विनियोग कंपनीने औद्योगिकरणासाठी न करता सदर जमीन परस्पर विकासकाला शासनाच्या परवानग्या न घेता विकली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्पेशन स्टिल कंपनीच्या मालकाने शासनाची फसवणूक करुन परस्पर जमीनीची विक्री केल्याप्रकरणी उक्त कंपनीच्या मालकाविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच सदर जमीन ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाहीची केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-११-२०१७) :(१) हे अंशत: खरे आहे.

मौजे मागाठणे ता.बोरीवली येथील स.नं.२३/३ व इतर मधील एकूण ३२,१८२.२० चौ.मी. ही जमीन स्पेशल स्टील लिमीटेड (सध्याची टाटा स्टील लि.) ह्या कंपनीच्या स्टोरेज गोडाऊनचा विस्तार व कंपनीच्या कामगारांच्या निवासासाठी भूसंपादन अधिनियम, १८९४ अंतर्गत संपादित करुन दिलेली आहे.

(२) हे खरे नाही.

तत्कालीन (मंत्री) महसूल यांनी अर्धन्यायिक सुनावणी घेऊन मे.स्पेशल स्टील लि. (सध्याची टाटा स्टील लि.) या कंपनीस संपादित करुन दिलेल्या एकूण ३२,१८२.२०चौ.मी. जमिनीपैकी सुमारे २९,१३०.४०चौ.मी. क्षेत्राचे मे.इन्क्लाईन रियॅल्टी प्रा.लि. या कंपनीस विक्री व हस्तांतरणास अटी व शर्ती अधीन राहून पारित केलेले आदेश शासन पत्र क्र.जमीन-२६१४/प्र.क्र.९६/ज-३, दि.२८.८.२०१४ अन्वये पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी निर्गमित करण्यात आलेले आहेत.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी संबंधित लेखाधिकारी यांचे तपासणीअंती परिगणित केलेली ५०% अनर्जित उत्पन्नाची रक्कम रुपये ४४,९८,४०,०६३/- ही दि.८/१०/२०१४ रोजी टाटा स्टील लिमिटेड या कंपनीने धनादेशाद्वारे शासन जमा केलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

ई-दस्त नोंदणी करताना दोन्ही पक्षांकडून आधार क्रमांकाचा वापर करण्याबाबत

(१०) ६६८८५ (१६-१२-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ई-दस्त नोंदणी करताना दोन्ही पक्षांकडून आधार क्रमांकाचा वापर केला जाणार असल्याने साक्षीदारांची गरज लागणार नाही असा प्रस्ताव नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने राज्य शासनाकडे पाठविला असल्याचे दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने उक्त प्रस्तावावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-११-२०१७) :(१), (२) व (३) होय, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने नोंदणी अधिनियमातील तरतुदींनुसार सहमती वर आधारित "आधार" सत्यापीकरण सेवा "Consent based Aadhar Authentication Services" करिता नियम विहीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

घाटकोपर (मुंबई) पश्चिमेकडील जगतशहा नगरातील अवधुत सोसायटीच्या पुनर्विकासाबाबत

(११) ६९०५२ (१३-०२-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर (मुंबई) पश्चिमेकडील जगतशहा नगरातील अवधुत सोसायटीचा पुनर्विकास करणाऱ्या कुमार बिल्डरकडुन गत ८ ते १० वर्षापासुन अटी व शर्तीचे पालन न केल्याच्या निषेधार्थ रहिवाशांनी उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढल्याची बाब दिनांक ३ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित रहिवाशांना जिल्हाधिकारी यांनी दुपारी ३.३० वा भेटण्याची वेळ देऊनही जिल्हाधिकारी स्वत: कार्यालयात या रहिवाशांच्या भेटीकरीता थांबले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी न्याय मिळण्याबाबत रहिवाशांनी शासनाकडे निवेदनाद्वारे वेळोवेळी मागण्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सुमारे २२६ रहिवाशांना फसविणाऱ्या तसेच कराराचे पालन न करणाऱ्या कुमार बिल्डर विरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२६-१०-२०१७) :(१), (२), (३) व (४) घाटकोपर, ता. कुर्ला येथील न.भू.क्र. ७४, ७४/१ ते ३३ या मिळकतीबाबत मा. मुंबई उच्च न्यायालय येथे आरबीट्रेशन पिटीशन (एल) नं. ५०३/२०१६ (जगदुशानगर अवधुत को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. विरूध्द कुमार हौसिंग कार्पोरेशन प्रा.लि.) मध्ये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी या प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १०६ व १३५ अन्वये कार्यवाही करणे उचित

असल्याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयास पत्र दिले होते. त्यानुषंगाने नगर भूमापन अधिकारी, घाटकोपर यांनी सदर मिळकतीच्या क्षेत्र दुरूस्तीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडे सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या समोर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार दिनांक ०३/०९/२०१६ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सदर दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढल्याची बाब आढळून आली नाही. तथापि, सदर दिवशीच्या सुनावणीकरिता ७८ व्यक्ती सुनावणीसाठी उपस्थित होत्या. तथापि, दिनांक ०३/०९/२०१६ रोजी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना मंत्रालयामध्ये बैठकीसाठी उपस्थित रहावे लागल्याने सदर सुनावणीची कार्यवाही होऊ शकली नाही. याबाबत सुनावणीसाठी उपस्थित असलेल्या संबंधित ७८ व्यक्तींना समज देऊन तशी रोजनाम्यावर नोंद घेऊन स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या होत्या.

प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे निवेदने प्राप्त झालेली आहेत. प्राप्त निवेदनांवर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी सर्व संबंधितांना सुनावणीची संधी देऊन दिनांक २०/९/२०१६ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम १०६ व १३५ अन्वये क्षेत्र व हद्द दुरूस्तीबाबत आदेश पारीत केलेले आहेत. सदर आदेशाविरूध्द अपर आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे विविध गृहनिर्माण संस्थांनी अपिले दाखल केलेली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मिठागराच्या जमिनी विकण्याचा आणि उड्डाणपुला खालील जमीनी भाडेतत्वावर देण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

(१२) ७१४७० (१३-०२-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महसूल वाढविण्यासाठी शासनाने मिठागराच्या जमिनी विकण्याचा आणि उड्डाणपुला खालील जमीनी भाडेतत्वावर देण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जागा विकण्यासाठी व भाडेतत्वावर देण्यासाठी शासनाने कोणत्या निकषाचा अवलंब केला आहे,

(३) असल्यास, अद्‌यापपर्यंत किती किती जमीन विकल्या असून किती जमिनी भाडेतत्वावर देण्यात आल्या आहे व त्यातून किती महसूल शासनाला प्राप्त झाला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२६-१०-२०१७) :(१) महसूल वाढविण्यासाठी शासनाने मिठागराच्या जमिनी विकण्याचा आणि उड्डानपुलाच्या खालच्या जमिनी भाडेतत्वावर देण्याचा निर्णय घेतलेला नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजा वरठी (ता.मोहोडी, जि.भंडारा) येथील प्राथमिक शाळेच्या क्रीडांगणावरील अतिक्रमण हटविण्याबाबत

(१३) ७५१०१ (१२-०४-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा वरठी (ता.मोहोडी, जि.भंडारा) येथील साझा क्र. २३ गट क्र. ३० मधील प्राथमिक शाळेच्या क्रीडांगणावर अनधिकृतरित्या असलेले अतिक्रमण काढण्यासाठी ग्रामवासी व स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ०३ मार्च, २०१५ व २५ जुलै, २०१५ रोजी जिल्हाधिकारी भंडारा यांच्याकडे तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर शाळेच्या क्रीडांगणावरील अतिक्रमण अद्यापही हटविण्यात आले नसून सद्यस्थितीत त्यावर पक्के बांधकाम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अतिक्रमण न हटविण्याची कारणे काय आहे,

(४) असल्यास, सदरचे अतिक्रमण हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०६-११-२०१७) :(१) (२) (३), (४) व (५) मौजा वरठी ता. मोहाडी जि.भंडारा येथील साझा क्र.२३, गट क्र.३० या सरकारी जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या असून, सदर शासकीय जमिनीवर अतिक्रमण असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर अतिक्रमण निष्कासित न करण्याबाबत अतिक्रमणदार श्रीमती छाया यावलकर यांनी मा. दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर), भंडारा येथे दाखल केलेल्या दिवाणी दावा क्र.१२८/२०१५ न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

हाळ (ता.खालापूर, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील वनखात्याच्या जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत

(१४) ७५४१० (१५-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हाळ (ता.खालापूर, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील जुन्या मुंबई-पुणे महामार्गालगत असणाऱ्या शासनाच्या वनखात्याच्या जमिनीवर अतिक्रमण करुन बांधकाम करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०८-११-२०१७) :(१), (२), (३) व (४) मौजे हाळ खुर्द ता.खालापूर जि.रायगड येथील स.नं.७/० क्षेत्र २-१८.० हे.आर या जमिनीच्या गा न नं भोगवटदार सदरी प्रोटेक्टेड फॉरेस्ट अशी नोंद असलेल्या सदर जमिनीवर अंदाजे १-४०.०० हे.आर क्षेत्रावर दोन व्यक्तींनी भंगार साठवणूक व भंगारच्या गाड्या उभे करण्यासाठी अतिक्रमण केले असल्याचे निदर्शनास आले होते. सदरचे अतिक्रमण मंडळ अधिकारी, खोपोली यांचे नेतृत्वाखाली नेमण्यात आलेल्या अतिक्रमण निष्कासन पथकाद्वारे दिनांक ०६/०६/२०१७ रोजी निष्काषित करण्यात आले आहे.

खापरखेडा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) या गावालगतची गायरान जमिन ग्रामपंचायतीला हस्तांतरीत करणेबाबत

(१५) ७७०९८ (१२-०४-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खापरखेडा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) या गावालगतच्या गट नं.१७७ मधील १८ हेक्टर, ४२ आर क्षेत्रफळ असलेल्या गायरान जमिनीपैकी ५ हेक्टर जमीन ग्रामपंचायतीला घरकुले बांधण्यासाठी हस्तांतरीत करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांनी जिल्हाधिकारी, हिंगोली यांना दिनांक २९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१३-११-२०१७) :(१) व (२) होय,सदर लेखी निवेदन तहसिलदार, कळमनुरी यांना प्राप्त झाले आहे. मा.सर्वोच्च न्यायालय यांचेकडील "सिव्हील अपील क्र. ११३२/२०११ @ एस एल पी (सी) ३१०९/२०११, जगपाल सिंग व इतर विरूध्द पंजाब राज्य व इतर" या याचिकेतील निर्देशानुषंगाने शासन निर्णय क्र.जमीन-०३/२०११/प्र.क्र.५३/ज-१,दि.१२.०७.२०११ निर्गमित करण्यात आला आहे.

या शासन निर्णयामधील तरतूदीनुसार गायरान जमीन अथवा सार्वजनिक वापरातील जमीन फक्त केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणा-या सार्वजनिक सुविधा (Public Utility) व सार्वजनिक प्रयोजन (Public Purpose) यासाठी अन्य जमीन उपलब्ध नसल्यास मंजूर करता येते. तसेच गायरान/गुरचरण अथवा गावक-यांच्या सार्वजनिक वापरातील जमीन कोणतीही व्यक्ती, खाजगी संस्था, संघटना यांना कोणत्याही प्रयोजनासाठी मंजूर करता येत नाही.

खाजगी लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी भुखंड देणे ही बाब सार्वजनिक प्रयोजनात मोडते किंवा कसे हे कायदेशीरदृष्टया तपासून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २२(अ) च्या तरतूदीच्या अनुषंगाने अशा प्रकरणी उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

चिखली (जि.बुलडाणा) येथील शेतक-यांना हस्तलिखित ७/१२ उतारा मिळत नसल्याबाबत

(१६) ७७१०९ (१२-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलडाणा) येथील शेतकऱ्यांना हस्तलिखीत ७/१२ उतारा मिळत नाही तसेच सर्व शेतकऱ्यांची माहिती अद्यापपर्यंत संगणकावर भरली गेली नसल्यामुळे ऑनलाईन ७/१२ ही मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या ७ मे, २०१६ च्या परिपत्रानुसार संगणक प्रणाली मध्ये संगणकीकृत कागदपत्रे उपलब्ध नसल्यास शेतकरी खातेदारांना कर्ज व अन्य शेती विषयी कामकाजासाठी हस्तलिखित अभिलेखावरुन गावनमुना, ७/१२ व आवश्यक कागदपत्रे देण्यात यावेत असे स्पष्ट आदेश देण्यात आले असतानाही अनेक तलाठी हस्तलिखीत कागदपत्रे देण्यास टाळाटाळ करुन शेतकऱ्यांना नाहक त्रास देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-१०-२०१७) :(१) व (२) असे निदर्शनास आले नाही.

(३) व (४) "ई-फेरफार" कार्यक्रम राज्यात राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने दि.२३.०१.२०१३ रोजी घेतला असून आजपर्यंत राज्यातील ३५८ पैकी ३५७ तालुक्यांचा (चंद्रपूर जिल्हयातील जिवती तालुका वगळून) संगणकीकृत गा.न.न. ७/१२ चा डाटा स्टेट डाटा सेंटरवर अपलोड करण्यात आलेला आहे व ऑनलाईन फेरफाराची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. जेथे तांत्रिक अडचणींमुळे संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ वितरीत करणे शक्य होत नव्हते अशा ठिकाणी केवळ शेतकरी खातेदारांना कर्ज व अन्य शेतीविषयक प्रयोजनाकरीता दि.३०.४.२०१७ पर्यंत हस्तलिखीत गा.न.नं. ७/१२ तलाठी व्दारे देण्यात येत होते. दि.१२.०९.२०१७ पर्यंत चिखली तालुक्यातील एडिट मॉड्युलचे कामकाज ९९% झालेले आहे.

तसेच संगणकीकृत अधिकार अभिलेख हस्तलिखित अधिकार अभिलेखाशी जुळविण्यासाठी एडिट मोड्युल अंतर्गत केलेल्या कामाची तपासणी करण्यासाठी शासनाने दिनांक १५ मे, २०१७ पासून राज्यात चावडी वाचनाची विशेष मोहिम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सदर चावडी वाचनामध्ये संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ मध्ये आढळून आलेल्या चूका दुरूस्त करण्यासाठी राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्यातर्फे रि-एडीट (Re-Edit) ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून सदर रि-एडीट मोड्यूलचा वापर करून दि.१२.०९.२०१७ पर्यंत राज्यात ९५३२ गावांतील संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ बिनचूक करण्यात आले आहेत. उर्वरीत गावांचे एडीट व रि-एडीट मोड्यूल चे काम तात्काळ करून घेण्याबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

कृषि पर्यटन अंतर्गत जिल्हा फळ रोप वाटीका व बुलढाणा येथील शासकीय तलावाच्या सुशोभिकरणाच्या कामास विलंब होत असल्याबाबत

(१७) ८००३५ (१४-०४-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषि पर्यटन अंतर्गत जिल्हा फळ रोप वाटीका व बुलढाणा येथील शासकीय तलावाच्या सुशोभिकरणाच्या भाग-१ व भाग-२ या कामास बऱ्याच कालावधीपासून मंजूरी प्रदान केली असतानाही सदर काम संथ गतीने सुरू असल्यामुळे या कामास विलंब होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, कृषि पर्यटन अंतर्गत जिल्हा फळ रोप वाटीका व बुलढाणा येथील शासकीय तलावाच्या सुशोभिकरणाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२४-१०-२०१७) :(१) अशंत: खरे आहे.

(२), (३) व (४) कंत्राटदाराकडून सदर काम करण्यास विलंब झाल्यामुळे दि.१.०३.२०१७ पासुन प्रतिदिन रु.५०/- प्रमाणे एकूण रु.९०००/- इतका दंड त्यांच्या देयकातून वसूल करण्यात आलेला आहे. कृषि पर्यटन अंतर्गत जिल्हा फळ रोप वाटीका व सरकारी तलाव बुलढाणाच्या सुशोभिकरणाचे काम जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत ऑगस्ट २०१७ अखेर पूर्ण करण्यात आले आहे.

रेतीबंदर (जि.ठाणे) येथील महसूल विभागाच्या जागेत ठाणे महानगरपालिका चौपाटी तयार करणार असल्याबाबत

(१८) ८०३७८ (१२-०४-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेतीबंदर (जि.ठाणे) येथील महसूल विभागाच्या जागेत ठाणे महानगरपालिका चौपाटी तयार करणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त चौपाटीच्या नियोजित जागेवर सद्यस्थितीत मोठया प्रमाणात अवैध रेती उपसा होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर ठिकाणी अवैध रेती उपसा करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (३१-१०-२०१७) :(१) होय. ठाणे महानगरपालिकेने असे ठरविले आहे.
(२), (३) व (४) होय.

सदर ठिकाणी अवैध रेती उपसा होत असल्याची बाब निदर्शनास आलेल्या प्रकरणांत संबंधित मंडळ अधिकारी/ तलाठी यांचे पथकामार्फत कारवाई करुन स्थानिक पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द १० गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. तसेच ५ वाहने जप्त करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजा धुसाळा-धोरपड (ता.मोहाडी, जि.भंडारा) रस्त्याचे बांधकामाकरिता संपादित खाजगी जमिनीचा मोबदला देण्यास विलंब होत असल्याबाबत

(१९) ८०४८१ (१२-०४-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा धुसाळा-धोरपड (ता.मोहाडी, जि.भंडारा) या इ.जि.मा. २८ रस्त्याच्या बांधकामाकरिता शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांना दिनांक ६ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (२४-१०-२०१७) :(१) हे खरे आहे.

(२) सदर रस्त्याचे काम व भूसंपादनाचे काम पूर्ण करण्यात आले असून भूसंपादनाचे मूल्य अदा करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

जळगाव तहसिल कार्यालयासाठी नवीन इमारत बांधणेबाबत

(२०) ८२४७२ (१२-०४-२०१७). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव तहसिल कार्यालयाची इमारत जीर्ण झाली असून नवीन इमारत बांधणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त तहसील कार्यालयासाठी नवीन इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (३१-१०-२०१७) :(१) जळगांव शहर तहसिल कार्यालयाची इमारत जीर्ण झालेली नसून सुस्थितीत आहे. मात्र, सध्याच्या ठिकाणी कार्यरत तहसिल कार्यालयास जागा अपुरी पडत असल्याने नवीन इमारत बांधणे गरजेचे आहे.
(२) व (३) तहसिल कार्यालय, जळगांव या साठी नवीन इमारत बांधण्याकरिता जिल्हाधिकारी, जळगांव यांनी जळगांव शहरात दोन एकर जागा मंजूर केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वसई तालुक्यातील (जि.पालघर) दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये विशेष संगणकीय प्रणाली विकसीत करण्याबाबत

(२१) ८४३४३ (१२-०४-२०१७). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील स्थावर मालमत्तेचे मुल्यांकन सोपे करण्यासाठी व्हॅल्युएशन मॉडेल ही संगणकीय प्रणाली विकसीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रणाली विकसित करण्यात आली असताना सुद्धा वसई तालुक्यात स्थावर मालमत्तेची नोंदणी करताना त्याची रेडीरेकनरच्या दरानुसार नेमकी किंमत किती व त्यावर किती मुद्रांकशुल्क भरावे लागेल याची माहिती सहजपणे नागरीकांना मिळत नसल्यामुळे मुल्यांकनासाठी दलालाकडून नागरीकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वसई तालुक्यातील दुय्यम निबंधक कार्यालयात व्हॅल्युएशन मॉडेल ही विशेष संगणक प्रणाली विकसित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२४-१०-२०१७) :(१) हे खरे आहे.
(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे माडखोल (ता.सांवतवाडी, जि.सिंधुदूर्ग) येथील जागांच्या नोंदी सातबारामध्ये सावंतवाडी मर्कजी जमातूल मुसलमीन मुंबई या संस्थेच्या नावे करण्याबाबत

(२२) ८४७७५ (२२-०५-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.शेख हुसेन शेख कासम रेडेकर यांच्या मौजे माडखोल (ता.सांवतवाडी, जि.सिंधुदूर्ग) येथील सर्व्हे न. ११०/२, ११०/६, ११०/९, ११०/१०, ११०/११, ११०/१२, ११३/१, ११३/२, ११३/३, ११३/४, ११३/५, ११३/६, ११३/७, ११३/८, ११३/९, ११३/१०, ११३/११, ११३/१३, ११३/१४, ११३/१६,११३/१८, ११३/२०, ११३/२१, ११३/२३, ११३/२४, ११३/२५, ११३/२७, ११३/२९, ११३/३०, ११३/३१, ११३/३२, ११३/३३, ११३/३४ व ११३/३५ या जागा बक्षिसपत्राव्दारे सन १९५६ मध्ये सावंतवाडी मर्कजी जमातूल मुसलमीन, मुंबई या संस्थेस दिल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बक्षिसपत्रानुसार सदर जागांची नोंदणी सावंतवाडी मर्कजी जमातूल मुसलमीन, मुंबई या संस्थेच्या नावे सहायक निबंधक कार्यालय, मुंबई येथे दिनांक २२ मे, १९५६ रोजी करण्यात आली असताना सुध्दा सदर जागांच्या नोंदी सातबारातील भोगवटदाराच्या रकान्यामध्ये सावंतवाडी मर्कजी जमातूल मुसलमीन, मुंबई या संस्थेच्या नावे अदयाप करण्यात आल्या नसल्याचे दिनांक १० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या जागेच्या नोंदी सातबारातील भोगवटदाराच्या रकान्यामध्ये सावंतवाडी मर्कजी जमातूल मुसलमीन, मुंबई या संस्थेच्या नावे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-११-२०१७) :(१), (२) व (३) सावंतवाडी मर्कजी जमातूल मुसलमीन, मुंबई या संस्थेस सदर मिळकत बक्षिसपत्राने दिल्याबाबत फेरफार रजिष्टर मध्ये फेरफार क्र.१७८७, दिनांक ११.०४.१९६६ अशी नोंद आहे. परंतु फेरफार रजिष्टर जीर्ण झाल्याने फेरफार मंजूर केली किंवा नामंजूर केली हे समजुन येत नाही. सदर मिळकतीच्या इतर हक्कात 'मुंबई कुळ कायदा कलम ६४ विरुध्द व्यवहार' असा शेरा नमुद आहे. वरील वस्तुस्थिती विचारात घेता अर्जदार, यांना बक्षिसपत्र देण्यापूर्वी मिळकतीस कुळ लागलेली आहे. मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम, कलम ६३ नुसार शेतजमीन घेणारी व्यक्ती ही शेतकरी असणे आवश्यक आहे. तथापि, सावंतवाडी मर्कजी जमातूल मुसलमीन मुंबई ही, शेतकरी नसुन संस्था असल्याने तिचे नाव कब्जेदार सदरी न ठेवता ते इतर हक्कात ठेवण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

माथेरान (ता.कर्जत, जि.रायगड) येथील रामबाग पॉईंट पायथ्यापासून सोंडेवाडीपर्यंत घाटरस्ता बांधण्याबाबत

(२३) ८६१४९ (१२-०८-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (ता.कर्जत, जि.रायगड) येथील रामबाग पॉईंट पायथ्यापासून सोंडेवाडीपर्यंत ५ कि.मी. चा पक्का घाटरस्ता बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक ४ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०२-११-२०१७) :(१) होय.
(२) व (३) रामबाग पॉईंट ते सोंडेवाडी पर्यंतचा रस्ता घाट भागातील असून या दोघांमधील उंचीचा फरक ५८५ मीटर एवढा आहे. तसेच सदरचा भाग Eco Sensitive Zone मध्ये येतो. सदर ठिकाणची भौगोलिक परिस्थिती पाहता वाहतुकीच्या दृष्टीने रस्ता तयार करणे व्यवहार्य नाही.

अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

(२४) ८६५०१ (१२-०८-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील सर्व रस्त्यांची दुरवस्था झाली असून अलिबाग-सुडकेली या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी एका महिन्याच्या कालावधीत तीन वेळा नागरिकांनी आंदोलने केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जनसेवा विक्रम मिनीडोअर चालक संघटनेने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची दिनांक ११ मे, २०१७ रोजी भेट घेऊन अलिबाग तालुक्यातील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अलिबाग तालुक्यातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०९-११-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) होय
(४) अलिबाग रोहा कणघर वावे रस्ता (रा.मा. ९१) कि.मी. ०/०० ते ८५/६०० मध्ये रस्ता सुधारणेचे काम ॲन्युईटी अंतर्गत मंजूर असून सदर कामाची निविदा प्रक्रीया प्रगतीत आहे.

प्रश्नांकीत अलिबाग-सुडकोली रस्ता तसेच अलिबाग तालुक्यातील प्रमुख्य राज्य मार्ग, राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग रस्त्याच्या देखभाल व दुरुस्तीकरीता शासनाच्या व्दिवार्षिक देखभाल व दुरुस्ती धोरणांतर्गत डांबर व खडीने खड्डे लवकरात लवकर भरण्याचे नियोजन आहे.

सद्यस्थितीत रस्त्यावरील खड्डे खडी, ग्रीटने भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आदिवासी भागातील जमिनी बिगर आदिवासी खरेदी करीत असल्याबाबत

(२५) ८६५४७ (१२-०८-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी भागातील जमिनी बिगर आदिवासीं खरेदी करीत असून गत अडिच वर्षात आदिवासी जमिनी विक्रीसंदर्भात जवळपास ४५० प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनींच्या हस्तांतरण करतांना महसूल विभागातील अधिकारी जात वैधता प्रमाणपत्राची मागणी न करताच जमिनी हस्तांतर करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी भागातील जमीनी बिगर आदिवासी खरेदी-विक्री प्रकरणी चौकशी करण्यासाठी समिती गठीत करण्याचे आश्वासन मा.महसूल मंत्री महोदयांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०१७ मध्ये दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर समितीने चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल शासनाकडे सादर केला आहे काय,

(५) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने आदिवासींच्या जमिनी खरेदी करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०३-११-२०१७) :(१) राज्यातील आदिवासी धारकांचा भोगवटा बिगर आदिवासींना हस्तांतरीत करण्यास परवानगी देण्याबाबतचे सुमारे साडेपाचशे प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले आहेत.

(२) व (३) अशी बाब शासनाच्या निदर्शनास आली नाही. तथापि, अशा हस्तांतरणाच्या प्रकरणांची चौकशी करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबतचे आश्वासन मा.मंत्री (महसूल) महोदयांनी सन २०१७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिले असल्याचे आढळून आले नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

सटाणा (जि.नाशिक) येथील तलाठी सातबारा उतारा विहित वेळेत देत नसल्याबाबत

(२६) ८७४३४ (१९-०८-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सटाणा (जि.नाशिक) येथील तलाठी सातबारा उतारा विहित वेळेत देत नसल्याचे माहे मे, २०१७ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनूसार सातबारा उताऱ्यांसाठी शेतकऱ्यांना नाहक विलंब लावणाऱ्या तलाठ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-१०-२०१७) :(१) सटाणा (जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांना सातबारा उतारा वेळेत देत नसल्याबाबतची तोंडी अथवा लेखी तक्रार माहे मे,२०१७ या महिन्यात किंवा त्या दरम्यान प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) येथील दुय्यम निबंधक कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करणेबाबत

(२७) ८७५१७ (१२-०८-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील दुय्यम निबंधक कार्यालयाची इमारत बांधण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तातडीने निर्णय घेऊन गडहिंग्लज येथील दुय्यम निबंधक कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२४-१०-२०१७) :(१) व (२) दुय्यम निबंधक, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर या कार्यालयाच्या इमारत बांधकामाकरीता प्रशासकीय मान्यता घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्तावाची शासन स्तरावर छाणणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) बस स्थानकासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत

(२८) ८७९८७ (१२-०८-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) या तालुक्याच्या ठिकाणी ३० वर्षाहून अधिक काळापासून बस स्थानक नसल्यामुळे वाहतूकीची कोंडी होऊन जनतेची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैभववाडी येथील बस स्थानकासाठी १२०० चौमी जागा मिळण्यासाठी एसटी महामंडळाने महसूल विभागाकडे पैसे भरलेले असतानाही महसूल प्रशासनाने एसटी महामंडळाला जागा दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी महसूल विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करित असल्यामुळे बस स्थानकासाठी त्वरीत जागा न दिल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा येथील जेष्ठ समाज सेवक शांताराम रावराणे व अन्य ग्रामस्थांनी माहे मे, २०१७ मध्ये दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून वैभववाडी बस स्थानकासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०८-११-२०१७) :(१) होय.

(२) नाही.

(३), (४) व (५) मौजे वाभवे, ता.वैभववाडी येथील स.नं.३६ अ पैकी १२८५.०० चौ.मी शासकीय जमीन शासन आदेश दिनांक २१.०८.२०१४ अन्वये परिवहन महामंडळास बसस्थानकासाठी, विभाग नियंत्रक राज्य परिवहन मंडळ, सिंधुदुर्ग यांना विहीत अटी व शर्तीच्या अधीन राहून कब्जेहक्काने हस्तांतरीत करणेस मान्यता देण्यात आली होती. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी दिनांक २६.०९.२०१४ च्या पत्रान्वये कब्जेहक्काची रक्कम एक महिन्यात शासनजमा करणेबाबत कळविण्यात आले होते. तद्नंतर दिनांक ०५.११.२०१४ अन्वये विभाग नियंत्रक राज्य परिवहन महामंडळ सिंधुदुर्ग यांनी उक्त शासकीय जमीन ही विना वापर असून तसेच महामंडळाची आर्थिक स्थीती बिकट असलेने सदरील जमीन बसस्थानकासाठी विनामुल्य मिळणेबाबत विनंती केली होती. दरम्यान राज्य परिवहन महामंडळ, सिंधुदुर्ग यांनी दिनांक ३१.०३.२०१७ अन्वये कब्जेहक्काची रक्कम शासनजमा केलेली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचे दिनांक १८.०४.२०१७ च्या आदेशान्वये मौजे वाभवे, ता.वैभववाडी येथील स.नं.३६अ एकूण ०.६४.३६ पैकी १२८५ चौ.मी शासकीय जमीन त्यावरील अल्पबचत व मंडळ अधिकारी कार्यालयाचे इमारतीसह बसस्थानक प्रयोजनासाठी विहित अटी व शर्तीवर मंजूर करण्यात आलेली आहे. दिनांक २०.०७.२०१७ रोजी बसस्थानकासाठी, विभाग नियंत्रक राज्य परिवहन मंडळ, सिंधुदुर्ग यांना तहसिलदार, वैभववाडी यांचेमार्फत सदर शासकीय जागेचा ताबा देणेत आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणी ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन करणेबाबत कोणतेही निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केल्याचे आढळून येत नाही.

मौजा पेनटाकळी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) गावाच्या गावठाण विस्ताराबाबत

(२९) ८८०३१ (१२-०८-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा पेनटाकळी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) या गावाच्या गावठाण विस्ताराबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती यांनी प्रधान सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास पाठविल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, असल्यास, त्याचे स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (२६-१०-२०१७) :(१), (२) व (३) मौजे पेनटाकळी, ता.मेहकर, जि.बुलढाणा या गावाच्या गावठाण विस्ताराबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे कार्यालयाकडून शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यातील महसूल विभागातील पदे भरण्याबाबत

(३०) ८८१९० (१२-०८-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील महसूल विभागातील उपजिल्हाधिकारी, नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी व तलाठी इत्यादी महत्वाची पदे अनेक वर्षांपासून रिक्त असून सदरची पदे न भरल्याने कार्यरत अधिकाऱ्यांवर अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या रिक्त पदांमुळे नागरिकांची अनेक कामे प्रलंबित ठेवण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून रायगड जिल्ह्यातील महसूल विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (३१-१०-२०१७) :(१) व (२) रायगड जिल्ह्यात उपजिल्हाधिकारी संवर्गातील २ पदे, तहसिलदार संवर्गातील ३ पदे, नायब तहसिलदार संवर्गातील ३४ पदे व तलाठी संवर्गातील ३५ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकारी/कर्मचा-यांकडे सोपविण्यात आला असून नागरीकांच्या कामात विलंब झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) वित्त विभाग शा.नि. क्र. पदनि-२०१६/ प्र.क्र.३०/२०१६/ आ.पु.कक्ष दिनांक २५.०५.२०१७ अन्वये वेतनावरील खर्च नियंत्रित करण्याचे निदेश असल्याने विभागाच्या आकृतिबंधास मान्यता प्राप्त करुन घेऊन रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

दिंदोडा बॅरेज (जि.चंद्रपूर) प्रकल्पासाठी शासनाने भूसंपादीत केलेल्या जमिनीचा सुधारीत दराने मोबदला मिळण्याबाबत

(३१) ८८४५० (१२-०८-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिंदोडा बॅरेज (जि.चंद्रपूर) प्रकल्पासाठी शासनाने भूसंपादीत केलेल्या जमिनीचा सुधारीत दराने मोबदला मिळण्याबाबत हिंगणघाट येथील स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.जलसंपदा मंत्री यांना दिनांक १४ डिसेंबर, २०१४ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, असल्यास, निर्णयाचे स्वरूप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-११-२०१७) :(१) अशा प्रकारचे निवेदन तपासणीअंति प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

कासा खुर्द (ता.डहाणू, जि.पालघर) येथील आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याबाबत

(३२) ८८५२१ (१९-०८-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)कासा खुर्द (ता.डहाणू, जि.पालघर) येथील गट नं २०/९ (जुना सर्वे नं.६२) ही जमीन महादू वाळ्या वावरे या आदिवासी खातेदाराच्या नावे असून त्यांच्या मृत्यू पश्चात सदर जमीन त्यांचा मुलगा रघुनाथ वावरे याच्या नावे झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्यस्थितीत या जमिनीवर अतिक्रमण करून अनधिकृत झोपड्या उभारण्यात आल्या असून जिल्हाधिकारी, पालघर यांनी महसूल अधिनियम १९६६ च्या तरतुदीप्रमाणे दिनांक १८ मे, २०१७ रोजी सदर जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचे अनधिकृत अतिक्रमण हटविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्यांना कासा पोलिसांनी अटक केली असल्याचे दिनांक १९ मे, २०१७ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून सदर जमिनीवरील अनधिकृत अतिक्रमण हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (०८-११-२०१७) :(१) हे खरे नाही.

मौजे कासा खुर्द, ता.डहाणू जि.पालघर येथील गट नं.२०/९ नसून गट.नं २०/१ असा आहे. (जुना स.नं.६२ क्षेत्र ०-८१.० हे.आर) ही जमीन महादू वाल्या वावरे यांचे नावे दाखल आहे.
(२) उक्त जमिनीवर बिगर आदिवासी श्री.विठ्ठल माणिक जाधव व इतर २७ इसमांनी केलेल्या अतिक्रमणा विरुध्द श्री.महादू वाल्या वावरे तर्फे कु.मु.धारक श्री.रघुनाथ महादु वावरे यांनी आदिवासी जमिनी प्रत्यार्पण कायदा १९७४ अन्वये शेतजमीन न्यायाधिकरण तथा तहसिलदार, डहाणू यांचेकडे दावा दाखल केला होता. प्रकरणी मंडळ अधिकारी कासा यांनी स्थळ पाहणी अहवालावरुन सदर जमिनीत श्री.विठ्ठल माणिक जाधव व इतर २७ बिगर आदिवासी इसमांनी २० गुंठे जमिनीवर अनधिकृतपणे बांबुचे प्लास्टीक छप्पर बनवून झोपड्या बांधून मागील १ वर्षापासून वास्तव्य असल्याचे आढळून आल्याने प्रकरणी तहसिलदार, डहाणू यांना सदरचे अतिक्रमण निष्कासित करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक ०५.०४.२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या होत्या. त्यानुसार दिनांक १८.०५.२०१७ रोजी सदरची बांधकामे निष्कासित करण्याकरिता ठरविण्यात आली होती.
(३) मनाई आदेश असताना त्या कालावधीत बेकायदेशीर जमाव केल्याने रघुनाथ महादू वावरे व इतर यांच्या विरुध्द पोलीस अधिनियम कलम ३७(१),(३) अन्वये गुन्हा दाखल करुन दिनांक १७.०५.२०१७ रोजी अटक करण्यात आलेली आहे.
(४) व (५) सहा.जिल्हाधिकारी, डहाणू यांनी दिनांक १६.०५.२०१७ च्या पत्रान्वये प्रश्नाधिन जमिनीच्या पोटहिश्याचे मोजणी झाल्याशिवाय जमिनीबाबत निर्णय घेणे योग्य होणार नसल्याचे अभिप्राय दिल्याने प्रकरणी निष्कासनाबाबतची कार्यवाही तूर्तास थांबविण्यात आली आहे. दरम्यान अतिक्रमणधारकांनी निष्कासनाविरुध्द दिवाणी न्यायालयात वरि.स्तर येथे दावा दाखल केला आहे.

अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील भूमिअभिलेख कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

(३३) ८९६४५ (१२-०८-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील भूमिअभिलेख कार्यालयात उपनिबंधक, भूमापन अधिकारी, दप्तरबंद व शिपाई यांची मोठया प्रमाणात रिक्त पदे असल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांची भूमापनाची कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने भूमिअभिलेख कार्यालयातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-११-२०१७) :(१) उप अधिक्षक भूमि अभिलेख, अकोले या कार्यालयासाठी मंजूर असलेल्या २२ पदांपैकी १८ पदे भरलेली असून निमतानदार क्र.१, दुरुस्ती लिपिक, प्रतिलिपी लिपिक व दफ्तरबंद ही चार पदे रिक्त आहेत.

उप अधीक्षक भूमि अभिलेख, अकोले या कार्यालयातील माहे जुलै २०१७ अखेर प्रलंबित असलेल्या ५३ मोजणी प्रकरणांपैकी ४५ प्रकरणात माहे - ऑगस्ट व सप्टेंबर २०१७ मध्ये मोजणी तारखा निश्चित केलेल्या आहेत. मा.न्यायालयाचे स्थगिती आदेश असल्याने ४ मोजणी प्रकरणे प्रलंबित आहेत. तसेच इतर ४ प्रकरणे प्रत्यक्ष मोजणी होऊन भूकरमापकांकडे कार्यालयीन कामावर प्रलंबित आहेत.
(२) होय.
(३) दि. ३१.०५.२०१७ रोजीच्या बदली आदेशान्वये रिक्त असलेले उप अधिक्षक भूमि अभिलेख हे पद तसेच रिक्त असलेले शिपाई संवर्गातील एक पद भरण्यात आले आहे. त्याशिवाय वर्ग ३ आणि वर्ग ४ संवर्गातील रिक्त पदे नजीकच्या काळात होणाऱ्या बदली/पदोन्नतीने भरण्याची दक्षता घेण्यात येत आहे. तसेच प्रलंबित मोजणी प्रकरणे निकाली करण्याबाबत जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर यांच्या स्तरावरुन नियोजन करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्हयातील झिरो माईल परिसरातील ९ हजार ५०० चौ.फुट जागा मत्स्य व्यवसाय संघटनेला देण्याबाबत

(३४) ८९९०५ (१२-०८-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील मत्स्यव्यवसायास प्रोत्साहन देण्याकरीता झिरो माईल परिसरातील १२ हजार, ५०० चौ. फुट जागेपैकी ९ हजार, ५०० चौ. फुट जागा मत्स्य व्यवसाय संघटनेला देण्यात आली होती परंतु जिल्हाधिकारी नागपूर यांनी सदर जागा परत घेण्याचे आदेश दिल्याचे दिनांक ५ मार्च, २०१७ रोजी वा दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जागा परत घेण्याची कारणे काय आहे,
(३) असल्यास, सदर परत घेतलेल्या जागेच्या बदल्यात दुसरी जागा मत्स्य व्यवसाय संघटनेला उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (०६-११-२०२७) :(१), (२), (३) व (४) मौजा सिताबर्डी येथील खसरा क्र. २८२ नगर भूमापन क्र. १८५३ व १८५४ येथील आराजी ९५२१ चौ.फूट जागा विदर्भ विभागीय मच्छीमार सहकारी संघ मर्या., नागपूर यांना कब्जेवहीवाटीने मंजूर करण्यात आली होती.

परंतु विदर्भ विभागीय मच्छीमार सहकारी संघ मर्या., नागपूर यांनी उक्त जमीन मत्यव्यवसाय व तद्संबंधी प्रयोजनार्थ न वापरता अनाधिकृतपणे इतर व्यक्तींना भाड्याने वाणिज्यिक वापराकरिता व मुलांचे वस्तीगृह इत्यादींसाठी देवून अनाधिकृत वापर केल्याचे आढळून आले. सदर संस्थेने केलेल्या शर्तभंगामुळे जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दि. २३.०२.२०१७ च्या आदेशान्वये उक्त जमीन शासन जमा करण्याचे आदेश दिले आहेत व अप्पर आयुक्त, नागपूर यांनी दि.१५.०३.२०१७ च्या आदेशान्वये जिल्हाधिकारी, नागपूर यांचे दि.२३.०२.२०१७ चे उक्त आदेश कायम केले आहेत. सदर आदेशाविरुद्ध उक्त संस्थेने मा.महसूल मंत्री यांचेकडे अपील दाखल केले असून त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच सदर संस्थेने वाणिज्यिक वापराकरीता भाड्याने दिलेल्या गाळेधारकांनी मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ येथे रिट पिटीशन क्रमांक १२३५/२०१७ दाखल केली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील ६३४ साकवाची निविदा प्रक्रिया रद्द झाल्याबाबत

(३५) ८९९८६ (१२-०८-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यामध्ये ६३४ साकव नादुरुस्त असून सदर साकवासाठी शासनाकडून १५ कोटी निधी मंजूर असूनही निविदा प्रक्रिया रद्द झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गंजलेले साकव कोसळण्याच्या घटना गेल्या तीन चार वर्षात घडत असूनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निविदा प्रक्रियेमध्ये तांत्रिक अडचण असल्याचे सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२७-१०-२०१७) :(१) व (२) साकव दुरुस्तीची निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आलेली नाही. एकुण ४०४ साकव दुरुस्तीच्या कामांपैकी २८ कामे पूर्ण झाली आहेत. त्याचप्रमाणे १३७ कामे प्रगती पथावर आहेत. व उर्वरित कामे निविदा प्रकिया स्तरावर आहेत. सदर कामे निधी उपलब्धतेच्या अधीनतेने पूर्ण करण्यात येणार आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कुडाशी गावाजवळील घाट सुधारणा कामासाठी व टेंभा पावरपाडा (ता.साक्री, जि.धुळे) रस्त्यावरील पुलाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

(३६) ९०२४६ (१२-०८-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळनेर-नवापूर (ता.साक्री, जि.धुळे) या रस्त्यावरील कुडाशी गावाजवळील घाट सुधारणा कामाचे व टेंभा पावरपाडा रस्त्यावरील मोहखेड नाल्यावरील लहान पुलाचे भूमीपूजन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही कामांसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे काय व सदर कामांना प्रत्यक्षात केव्हापासून सुरुवात होणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२४-१०-२०१७) :(१) होय.

(२) कुडाशी गावाजवळ घाट सुधारण्याचे काम सुरु करण्यात आले असुन, ते जवळ जवळ पुर्ण झाले आहे. त्यासाठी आतापर्यंत रु.३४.४७ लाख निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच टेंभा-पावरपाडा रस्त्यावरील पूलाचे काम पूर्ण झाले असुन, सदर कामाचे अंतिम देयक अदा करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्हयातील बादलापूर ते मांजरी रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम रखडल्याबाबत

(३७) ९०४७६ (१२-०८-२०१७). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बादलापूर ते मांजरी (जि.अकोला) या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम गत २० वर्षापासून रखडल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०२-११-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२) प्रश्नांकित रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम प्रगतीत असून ते मार्च २०१८ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नेवाळी (ता.कल्याण, जि.ठाणे) येथिल जमिनीबाबत

(३८) ९०५३६ (१९-०८-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवाळी (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील व आजूबाजूच्या परिसरातील दुसऱ्या महायुध्दावेळी युध्दकालीन वापरासाठी अधिग्रहीत केलेली १७०० एकर जमिन सहा महिन्याच्या कालावधीत शेतकऱ्यांना परत करण्यात येणार होती परंतु सदर जमीन अद्यापर्यंत शेतकऱ्यांना परत करण्यात आली नसून जमिनी परत मिळण्यासाठी येथील स्थानिक शेतकऱ्यांचा अनेक वर्षापासून संघर्ष सुरु असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन केंद सरकारच्या संरक्षण खात्याकडे आहे व या जागेवर नौदलाचे प्रशिक्षण केंद्र उभारले जाणार असून यासाठी दिनांक २२ जून, २०१७ रोजी जमिनीच्या सभोवती संरक्षक भिंतीचे बांधकाम सुरु करण्यात आले असून सदर बांधकामास शेतकऱ्यांनी विरोध करून पोलिसांवर दगडफेक केली व वाहने जाळली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर जमिनी केंद्र शासनाकडुन मुळ शेतकऱ्यांना परत मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०२-११-२०१७) :(१) व (२) हे अंशतः खरे आहे.

संघर्ष समितीचे लोक व स्थानिक शेतक-यांनी दि.२२.६.२०१७ रोजी रास्ता रोको / आंदोलन करण्यात आले होते.

सन १९४२ साली जिल्हाधिकारी ठाणे यांनी कल्याण तसेच अंबरनाथ परिसरातील नेवाळी आणि इतर १५ गावामधील जमिनी Defence of India Act & rules १९३९ चे नियम ७५ (A) (१) अन्वये अधिग्रहीत (Requisition) करण्यात आलेल्या आहेत. अधिग्रहीत केलेल्या जमिनीपैकी सन १९४३ चे सुमारास जिल्हाधिकारी, ठाणे यांनी Defence of India Act rules १९३९ चे नियम ७५ (A) मधील तरतुदीनुसार कल्याण आणि अंबरनाथ तालुक्यातील १५ गावांमधील सुमारे १६७३ एकर जमीन संपादीत (acquisition) करण्यात आली आहे. तद्नंतर सन १९५४ ते १९५७ चे सुमारास संपादित जमीनीच्या ७/१२ वर नेवाळी एरोड्रम, नेवाळी एअरपोर्ट इत्यादी प्रकारच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. संपादित जागेची मोजणी सन २०१५ मध्ये पूर्ण झालेली असून उक्त जमिनी संरक्षित करण्यासाठी नौदलाकडून संरक्षण भिंतीचे काम दि.२०.०४.२०१६ पासून सुरु करण्यात आलेले आहे. दि.२२.०६.२०१७ रोजी नेवाळी परिसरामध्ये केलेले आंदोलन हिंसक होऊन पोलिसांच्या गाड्या जाळणे व इतर हिंसक घटना घडलेल्या आहेत. त्याबाबत हिललाईन पोलिस स्टेशन येथे ३ गुन्हे व मानपाडा पोलीस स्टेशन, डोंबिवली येथे १ गुन्हा असे एकूण ४ गुन्हे दाख़ल करण्यात आलेले आहेत.

विषयांकित जमिनीच्या अनुषंगाने संबंधित ग्रामस्थांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.३४४६/२०१७ ते ३४६२/२०१७ दाखल असून याबाबत उपविभागीय अधिकारी, कल्याण/उल्हासनगर यांनी प्रतिज्ञापत्र मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले आहे. मा.न्यायालयाने कोणतेही आदेश अद्यापपर्यंत पारित केलेले नाहीत. सद्यस्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील भूमिहीन शेतकरी, शेतमजूर व कारागीर यांनी शासकीय जमिनीवर राहण्यासाठी केलेली अतिक्रमणे नियामानुकुल करणेबाबत

(३९) ९१३२४ (१९-०८-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भूमिहीन शेतकरी, शेतमजूर व कारागीर यांनी शासकीय जमिनीवर राहण्यासाठी अतिक्रमणे केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या भूमिहीन शेतकरी, शेतमजूर व कारागीर यांनी शासकीय जमिनीवर अतिक्रमणे केली आहेत त्यांना वार्षिक बाजारमूल्य दराच्या ५० टक्के रक्कम आकारून सदर अतिक्रमणे नियमित करण्यात यावीत अशी मागणी लोकप्रतीनिधिनी मा.मुख्यमंत्री व मा.महसूलमंत्री यांचेकडे दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजी व त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शेतकरी, शेतमजूर व कारागीर यांनी केलेली अतिक्रमणे नियामानुकुल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-११-२०१७) :(१) होय.

(२) होय.

(३) शासकीय जमिनीवर झालेली झोपडपट्टीची व अन्य अतिक्रमणे नियमानुकूल करणे व ते करतांना बाजारमुल्य/भुईभाडे व त्यावरील व्याज आकारण्याचा धोरणात्मक निर्णय शासन निर्णय एलईएन १०/२००१/प्र.क्र.२२५/ज-१, दि. ४ एप्रिल, २००२ अन्वये घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जिल्हाधिकारी, मुंबई व मुंबई उपनगर यांचेकडे भूसंपादनाचे १६७ प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

(४०) ९१३५४ (१९-०८-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विकास नियोजन खात्याच्या विविध जनमाहिती अधिकाऱ्यांनी माहे मे, २०१७ मध्ये दिलेल्या माहितीनुसार जिल्हाधिकारी, मुंबई व मुंबई उपनगर यांचेकडे भूसंपादनाचे १६६ प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भूसंपादन करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने जिल्हाधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर यांना ५४० कोटी रुपयांचा निधी दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भूसंपादनाअभावी आरक्षीत असलेल्या साकीनाका येथील मिठी नदी व विमानतळाला जोडणारा लाठीया रबर मार्ग, कुर्ला रेल्वेस्थानक व बीकेसीला जोडणारा लियाकत अली मार्ग विकसित करणे इत्यादी कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून सदर भूसंपादनाची कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (०२-११-२०१७) :(१) व (२) अंशत: खरे आहे.
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या कार्यालयाशी १२३ तर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयाशी ४४ प्रस्ताव असे एकूण १६७ प्रस्ताव संबंधित आहेत.
अ) जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडील एकूण ४४ प्रस्तावांपैकी १३ प्रस्तावांवर कार्यवाही सुरु आहे.
उर्वरित ३१ प्रस्तावांची विगतवारी खालीलप्रमाणे :-

१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून अप्राप्त - ९
२) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे परत पाठविण्यात आलेले - १७
३) कार्यवाही पूर्ण तथापि न्यायालयात प्रलंबित - ३
४) निवाडा घोषित परंतु बृहन्मुंबई महानगरपालिकेने ताबा न घेतलेले - २

ब) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडील एकूण १२३ प्रस्तावांपैकी ५३ प्रस्तावांवर कार्यवाही सुरु आहे.
उर्वरित ७० प्रस्तावांची विगतवारी खालीलप्रमाणे :-

१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे परत पाठविण्यात आलेले प्रस्ताव-५८
२) आरक्षण रद्द परंतु प्रस्ताव अप्राप्त - १
३) निवाडा घोषित करुन ताबा देणेसाठी - ५
४) कार्यालयास अप्राप्त - ५
५) कार्यवाही पूर्ण तथापि न्यायालयात प्रलंबित - १

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रस्तावांसाठी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडे सुमारे रु.२९४.७० कोटी इतका निधी जमा आहे.(प्रलंबित प्रकरणांसाठी सुमारे रु. २४७.४५ कोटी व महानगरपालिकेकडे परत केलेल्या प्रकरणांसाठी सुमारे ४७.२५ कोटी) आणि जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडे सुमारे रु.५७.५३ कोटी इतका निधी जमा आहे. (प्रलंबित प्रकरणांसाठी सुमारे रु. ४६.५० कोटी व महानगरपालिकेकडे परत केलेल्या प्रकरणांसाठी सुमारे ११.०३ कोटी) अशी एकूण सुमारे रु.३५२.२३ कोटी निधी रक्कम जमा आहे.

(३) अंधेरी के / पश्चिम विभागात एकूण २१ भूसंपादनाचे प्रस्तावांपैकी ५ प्रकरणांमध्ये भूखंडाची मालकी म्हाडाकडे असल्याने सदर प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेने परत घेतले आहेत. उर्वरित १६ भूसंपादन प्रस्तावांची विगतवारी खालीलप्रमाणे :-

१) भूसंपादन पूर्ण ; बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात - १

२) शासनकडून स्थगिती - १

३) मा. न्यायालयाने आरक्षण विरहीत घोषित केलेले - १

४) वेगवेगळ्या स्तरावर प्रलंबित -१३

(४) मुंबईतील महत्वाच्या विकास कामांना चालना देण्यासाठी रखडलेली भूसंपादनाची प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी शासन स्तरावरुन संबंधित जिल्हाधिकारी यांना शासन पत्र क्र.विसताप्र-०७/२०१७/प्र.क्र.१०७/अ-२, दि.०८/०८/२०१७ अन्वये आवश्यक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कळंबस्ते (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे उड्डाणपूल बांधण्याबाबत

(४१) ९१७५९ (१२-०८-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाला (रा.म.मा.६६) जोडून असणाऱ्या चिपळूण-कळंबस्ते-काडवली-धामनंद-चोरवणे (प्र.जि.मा.२२) या प्रमुख जिल्हा मार्गावर कळंबस्ते (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथून कोकण रेल्वेचा मार्ग गेलेला असून त्याठीकाणी असलेल्या रेल्वे फाटकाच्या ठिकाणी उड्डाण पुल उभारण्याची मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूकीची वर्दळ असून कळंबस्ते येथे कोकण रेल्वेच्या गाड्या ये-जा करतांना फाटक बंद राहत असल्यामुळे मोठी वाहतूक कोंडी होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून उक्त ठिकाणी उड्डाण पुल बांधून होणारी वाहतुकीची कोंडी दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-११-२०१७) :(१) होय हे खरे आहे

(२) अंशत: खरे आहे.

(३) कळंबस्ते रेल्वे फाटक येथे रेल्वे विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडुन ५०:५० टक्के खर्चाचा भाग उचलून आरओबी बांधण्याचे काम प्रस्तावित आहे. त्यासाठी रु.४७.०० कोटी खर्च अपेक्षीत आहे. सद्यस्थितीत सार्वजनिक बांधकाम विभाग व रेल्वे विभाग यांचेकडुन प्रस्तावित आरओबी जागेची प्राथमिक संयुक्तिक पाहणी करण्यात आली असून पुलाचे आखणी नकाशे तयार करण्याचे काम हाती घेण्यात येत आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही

रामटेक (जि.नागपूर) तालुक्यात विकास कामासाठी निधी मिळणेबाबत

(४२) ९१९८९ (१२-०८-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील रामटेक मतदार संघात विकासात निर्माण झालेला असमतोल दूर करुन ग्रामीण व आदिवासी क्षेत्रात तसेच शहरी भागात शासनाच्या विकासाच्या योजना व समस्या मांडून विकास कामासाठी निधी मिळावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी (रामटेक) यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री व संबंधित विभागातील अधिकारी यांच्याकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०२-११-२०१७) :(१) नागपूर जिल्हयातील रामटेक विधानसभा मतदार संघातील रस्ते व पुलांच्या कामांकरीता निधी मिळणेसंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून मा.मंत्री (सा.बां.) यांचेकडे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) प्रस्तूत प्रकरणी रस्ते व पूलाची कामे निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

राज्यातील आदिवासी जमिनींच्या विक्रीबाबत

(४३) ९२०४७ (१९-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासींच्या जमिनींची विक्री करताना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत संबधित जमिनीचा लिलाव करून अधिकाधिक फायदा आदिवासींना करून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाची अंमलबजावणी तातडीने होण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२५-१०-२०१७) :(१) असा प्रस्ताव महसूल विभागाच्या स्तरावर विचाराधीन नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

यावल (ता.यावल, जि.जळगाव) तहसील कार्यालयातील नायब तहसीलदारांची रिक्त पदे भरण्याबाबत

(४४) ९२३७१ (१९-०८-२०१७). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल (ता.यावल, जि.जळगाव) तहसील कार्यालयात नायब तहसीलदारांची ३ पदे रिक्त असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या रिक्त पदांमुळे कार्यालयीन कामकाजात अनेक अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यावल तहसील कार्यालयातील नायब तहसीलदारांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-११-२०१७) :(१) माहे जून, २०१७ मध्ये ता.यावल, जि.जळगांव तहसील कार्यालयात नायब तहसिलदारांची २ पदे बदलीने रिक्त झाली होती.

(२) व (३) सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य कर्मचा-याकडे देण्यात आल्याने कार्यालयीन कामकाजात अडचणी निर्माण झाल्या नाहीत.

विभागीय आयुकत, नाशिक यांच्या दि.१८.०८.२०१७ च्या आदेशान्व्ये निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, यावल हे पद भरण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद येथील क्रांती चौक-सिडको चौक-चिकलठाणा व औरंगाबाद-पंढरपूर-नगर रस्त्यावर ओएपाफसी केबल टाकण्यासाठी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरने सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबादकडे रु.५.९० कोटीची रक्कम वर्ग केल्याबाबत

(४५) ९३१४९ (१९-०८-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयामध्ये क्रांती चौक-सिडको चौक ते चिकलठाणा व औरंगाबाद-पंढरपूर-नगररस्ता या दोन रस्त्याच्या बाजूला ओएपाफसी केबल टाकण्यासाठी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरने सार्व.बांधकाम विभाग, औरंगाबाद यांच्याकडे एचडीएफसी व आयसीसीआय बँकेच्या खात्यात अंदाजित रु.५.९० कोटीची रक्कम रस्त्याच्या दुरुस्तीसाठी डिपॉझीट केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची ठेव रक्कम या दोन रस्त्यावर खर्च न करता पैठण तालुक्यातील रस्त्यावर कोणतेही कामे न करता व कोणतीही परवानगी न घेता खर्च केल्याचे कागदोपत्री दाखविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२४-१०-२०१७) :(१) हे खरे आहे.
(२) सदरची ठेव रक्कम पैठण तालुक्यातील विविध रस्त्यांच्या कामांवर खर्च झालेली आहे.
(३) या प्रकरणी अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांच्यामार्फत चौकशी सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे व रायगड जिल्ह्यातील वाळू तस्करीबाबत

(४६) ९३१८१ (१२-०८-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे व रायगड जिल्ह्यातील वाळू तस्करी करणारे ३२ ट्रक नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी दिनांक २४ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास पकडले असून उपविभागीय अधिकारी, कल्याण यांच्या वाळू वाहतुकीची परवानगीची पावती पुस्तके एका ठेकेदाराकडे सापडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीची फलनिष्पत्ती काय व त्यानुसार सदरची पावती पुस्तके बाळगणाऱ्या ठेकेदारावर व त्यांना मदत करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (३१-१०-२०१७) :(१), (२) व (३) रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील मौजे तळोजा येथे दिनांक १६ जून,२०१७ रोजी पहाटे पाच वाजताच्या सुमारास पोलीस उप आयुक्त, वाहतूक शाखा, नवी मुंबई व तहसिलदार, पनवेल यांनी वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या ३२ ट्रकवर संयुक्तपणे कारवाई करुन सुमारे रु.४,०६,०००/- किंमतीची ११६ ब्रास वाळू जप्त केली आहे.

सदर प्रकरणी संबंधितांवर खारघर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदर प्रकरणी एका ठेकेदाराकडे उपविभागीय अधिकारी, कल्याण यांनी मंजूर केलेले वाहतूक पासेस आढळून आले.

तथापि, उपविभागीय अधिकारी, कल्याण यांच्या वाहतूक परवाना मंजूरीच्या आदेशातील अटींचा भंग झाल्यामुळे त्यांच्या निर्देशानुसार संबंधित ठेकेदारावर बाजारपेठ पोलीस ठाणे, कल्याण येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

टापरगाव (जि.औरंगाबाद) येथील शिवना नदीवरील पुल वाहतुकीसाठी खुला करण्याबाबत.

(४७) ९४०२७ (१२-०८-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टापरगाव (जि.औरंगाबाद) येथील शिवना नदीवरील पुलाच्या तपासणीसाठी दोन कन्सल्टन्सी नेमूनही अद्यापपर्यंत पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला नसल्याने प्रवाशांची व इतर नागरिकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पूल वाहतुकीसाठी खुला करून प्रवाशांची होणारी गैरसोय दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१०-११-२०१७) :(१) व (२) केंद्र शासनाच्या औरंगाबाद-धुळे राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ चौपदरीकरणाचा प्रकल्प भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या मार्फत राबविण्यात येत असून सदर महामार्गावर साखळी क्रमांक ३५३.०० कि.मी. टापरगाव येथे शिवना नदीवर पूल असून ऑगस्ट व सप्टेंबर २०१६ मध्ये सदर पूलाची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये एका गर्डरला तडे गेल्याचे निर्दशनास आले त्यामुळे दि. ०४.१२.२०१६ ते १०.०५.२०१७ च्या कालावधीत सदर पूल सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहतूकीसाठी बंद करण्यात आलेला होता. तद्नंतर पुलाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करुन दि.१०.०५.२०१७ पासून सर्व प्रकारच्या वाहतूकीसाठी खुला करण्यात आल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजा मानेगांव (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) येथील शासकीय जमीन कृषि विज्ञान केंद्र स्थापन करण्यासाठी देण्याबाबत

(४८) ९४११४ (१२-०८-२०१७). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा मानेगांव (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) येथील सुमारे ३१.९२ हे.आर. एवढी शासकीय जमीन कृषि विज्ञान केंद्र स्थापन करण्यासाठी मिळणेबाबत महसूल व वन विभागाने विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडे अभिप्राय सादर करण्याबाबत पत्राव्दारे दिनांक ३ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडून अभिप्राय प्राप्त झाले आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (१३-१०-२०१७) :(१) व (२) होय. मौजे मानेगांव ता.मुक्ताईनगर जि.जळगांव येथील शासकीय जमीन कृषि विज्ञान केंद्र स्थापन करण्यासाठी मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावातील विचाराधिन जमीनीच्या गा.न.नं.७/१२ उताऱ्यावरील नोंदीच्या अनुषंगाने दिनांक ३/३/२०१७ च्या शासन पत्रान्वये विभागीय आयुक्त,नाशिक यांच्याकडे खुलासा मागविण्यात आलेला होता. विभागीय आयुक्त,नाशिक यांनी दिनांक २५/५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केलेला आहे.सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधित प्रशासकीय विभागांचे अभिप्राय घेण्यात येत असून प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी नागपूर राज्य मार्गासाठी जमीन अधिग्रहणाची कार्यवाही पूर्ण करण्याबाबत

(४९) ९४८१० (१५-०९-२०१७). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) रत्नागिरी नागपूर राज्य मार्ग चौपदरीकरणाबाबत दिनांक ५ जून, २०१६ रोजी राजपत्र प्रसिद्ध झाले असून या रस्त्यासाठी चाकूर तालुक्यातील १२ गावातील जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त १२ गावांपैकी ९ गावातील जमिनीचे मोजमाप करण्यात आले परंतु सीमांकन करणाऱ्या अधिकाऱ्याने चुकीचे सीमांकन केल्यामुळे जमीन मोजणीची प्रक्रिया रखडली असून हा रस्ता चाकूर शहरापासून दूर नेन्याचा प्रयत्न अधिकारी करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त १२ गावातील जमीन अधिग्रहणाची कार्यवाही पूर्ण करण्याबाबत तसेच सदर रस्ता चाकूर शहरापासून दूर न नेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२४-१०-२०१७) :(१) चाकूर तालुक्यातील १२ गावांमध्ये महामार्गासाठी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ च्या कलम ३ नुसार भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

चाकुर तालुक्यातील १२ गावापैकी ९ गावामधील महामार्गाची संयुक्त मोजणी पूर्ण करण्यात आली असून त्याबाबत रा.म. अधिनियम १९५६ नुसार कलम ३ (D) अधिसुचना दि.०४.०७.२०१७ रोजी भारत सरकारच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी चाकूर बाहयवळण रस्त्याच्या आखणीमध्ये जनतेकडून प्राप्त मागणीनुसार दि.१३.०१.२०१७ च्या पत्रान्वये सुधारीत आखणीस मान्यता दिली आहे. महामार्गावरील थेट वाहतूक चाकूर शहराच्या

बाहेरुन नेण्यासाठी बाहयवळण रस्ता बांधण्याचे प्रस्तावित असून चाकूर शहरामधून जाणा-या महामार्गाचीसुध्दा सुधारणा करण्यात येणार आहे.

मौ.मोहनाळ व लातूर रोड या गावातुन जाणा-या महामार्गाच्या आखणीमध्ये बदल झाला असल्याने त्यानुसार सुधारीत अधिसुचना ३ (A) क्र.२७६२ दि.०४.०८.२०१७ रोजी भारत सरकारच्या राजपत्रात प्रसिध्द झाली असून त्याबाबत राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ च्या कलम ३ नुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नांदेड यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई - गोवा महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनींच्या मोबदला वाटपात झालेला गैरव्यवहार

(५०) ९४९८५ (२२-०९-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी महाड तालुक्यातील १२ आणि पोलादपूर तालुक्यातील ९ गावामधील जमीनी संपादन करण्यात आल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २४ मे, २०१७ पासून या गावातील प्रकल्पग्रस्तांना मोबदला वाटप करण्यास सुरुवात झाली असून दिनांक ३१ जुलै, २०१७ पर्यंत १४७ कोटी २२ लाख रुपये मोबदला वाटप करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या मोबदला वाटपात गैरव्यवहार सुरु असल्याचे आरोप करण्यात येत असून महाड प्रांत कार्यालयाकडे त्याबाबतच्या ६७० हरकती दाखल करण्यात आल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांच्या संपादित करण्यात आलेल्या जमिनींचा ५० टक्के मोबदला देखील अद्यापपर्यंत वाटप करण्यात आला नसल्याचे दिनांक ०९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून मोबदला वाटपात गैरव्यवहार करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच उर्वरित शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला तातडीने वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-११-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

मोबदला वाटपाबाबत ज्या हरकती प्राप्त झालेल्या आहेत, त्यात संबंधित खातेदारांच्या वारसांची नावे दाखल नाहीत, खातेदारांचे हिस्सा वाटप झालेला नाही,सदर मिळकतीबाबत पुर्वीचे हक्क व हितसंबंध आहे व कुळ-मालक वाद, अशा स्वरूपाच्या हरकती प्राप्त आहेत.

(४) हे खरे नाही.

सप्टेंबर, २०१७ अखेरपर्यंत एकूण रू. २९७,९९,००,०००/- (रू.२९७ कोटी ९९ लाख) एवढी मोबदल्याची रक्कम वाटप करण्यात आलेली आहे. सदर वाटप करण्यात आलेली रक्कम एकूण मोबदल्याच्या ५६% इतकी आहे.

(५) अशी बाब नाही.

मोबदला वाटपाची कार्यवाही सुरू आहे. मोबदला रक्कम चेकव्दारे संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते.

(६) मोबदला वाटपास विलंबाची कारणे, सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे आहेत.

१. मयत खातेदारांच्या वारसांची नावे ७/१२ वर दाखल झालेली नाहीत.

२. सह खातेदारांमध्ये पोटहिस्सा मोजणी झालेली नाही.

३. दिवाणी न्यायालयात दावे दाखल झालेले आहेत..

४. कुळ-मालक यांच्या मध्ये वाद आहेत.

विधान भवन :
नागपूर.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.